धुळे जिल्ह्यांमध्ये उद्योग सेतू कार्यान्वित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र.उसेतू २००९/प्र.क्र.२१९/उद्योग-८
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- १९ जुलै,२०१०.

वाचा: १. शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.उसेतू २००९/प्र.क्र.२१९/उद्योग-८, दि.२९ ऑगस्ट २००९
२. उद्योग संचालनालयाचे पत्र क्र.उंस/उ.स./धुळे /२०१०/ए १३०० दि.३० जून, २०१०

शासन निर्णय-

संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक १ दि. २९ ऑगस्ट २००९ अन्वये राज्यात नाशिक, पुणे, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, नांदेड, ठाणे, जळगांव, मुंबई प्राधिकरण विभाग या जिल्ह्यांमध्ये उद्योग सेतु उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

२. उद्योजकांना अत्यावश्यक असलेली ही सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने घेतलेल्या पुढाकारामध्ये आपला सहभाग म्हणून धुळे जिल्ह्यातील औद्योगीक संघटनांनी उद्योगसेतू कार्यान्वीत करण्यासाठी लागणा-या एकूण खर्चापेकी ५० टक्के आर्थीक भार उचलण्याची तयारी दाखविली आहे.त्यामुळे धुळे जिल्ह्यामध्ये उद्योग सेतू कार्यान्वीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक १ दि. २९ ऑगस्ट २००९ मधील इतर सर्व बाबी कायम असून त्यात कोणताही बदल नाही.

३. सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेताक २०१००७१९१९५६३६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दा. अं. कुलकर्णी)
शासनाचे अवर सचिव

प्रति,
मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

RCTM H 1706 (500-7-2010)L

Udyog Setu Dhule Amendment.doc

मा. उपमुख्यमंत्री यांचे उप सचिव
मा. मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा / महाराष्ट्र विधान परिषद
मा. मुख्य सचिव
सर्व अतिरिक्त मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
राज्यस्तरीय शिखर सोसायटीचे सर्व सदस्य
विकास आयुक्त (उद्योग), मुंबई (पाच प्रती)
मु.का.अ., मऔ.वि.महामंडळ, मुंबई (तीन प्रती)
विभागीय आयुक्त,नाशीक
जिल्हाधिकारी,धुळे
विभागीय उद्योग सहसंचालक, नाशिक.
प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नाशिक
उद्योग, उर्जा व कामगार विभागातील सर्व कार्यासने
मा. प्रधान सचिव (उद्योग) यांचे स्वीय सहाय्यक
मा. सचिव (पर्यावरण) यांचे स्वीय सहाय्यक
मा. सचिव (उर्जा) यांचे स्वीय सहाय्यक
मा. सचिव (कामगार) यांचे स्वीय सहाय्यक
निमंत्रक, उद्योग मित्र
धुळे जिल्हा सेतू सोसायटीचे अध्यक्ष व सर्व सदस्य (महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, धुळे यांचे मार्फत)
धुळे जिल्ह्यातील सर्व औद्योगिक संघटना
महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, धुळे (दहा प्रती)
निवड नस्ती

H 1706-1 ३५